दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २२५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१० नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# एसटी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विधानसभेत आवाज उठवणार : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी उपोषण सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून पनवेल बस आगारातील एस. टी. कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन करत संप सुरु केला आहे. एस. टी. कर्मचाऱ्यांच्या मागण्या जोपर्यंत मंजूर केल्या जात नाहीत, तोपर्यंत हा संप सुरु राहणार असल्याची भूमिका एस. टी. कर्मचाऱ्यांनी घेतली आहे. या भूमिकेबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल बस डेपोत एसटी कर्मचाऱ्यांची भेट घेऊन जाहीर पाठिंबा दिला आहे. त्याचबरोबर या संदर्भात कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विधानसभेत आवाज उठवणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले असून राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांचे आणि प्रवाशांचे हाल करू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले.




यावेळी पनवेल महानगरपालिकेचे नगर–सेवक मनोज भुजबळ, नगरसेविका दर्शना भोईर, कामगार नेते जितेंद्र घरत, गोपीनाथ मुंडे, चंद्रकांत मंजुळे, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. पनवेल आगारात एकूण ३०५ कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये चालक, वाहक व वाहन दुरुस्ती करणारे कर्मचारी आहेत. या संपामुळे पनवेल आगाराचे कामकाज ठप्प झाले आहे. या आंदोलनाचा फटका प्रवाशांना बसला आहे. पनवेल शहर हे दळणवळणाच्या दृष्टीने मध्यवर्ती ठिकाण आहे. मुंबई, ठाणे, कल्याण आदींसह घाटमाथा, कोकणात पनवेल बस आगारातून गाड्या सुटत असल्याने प्रवाशांची मोठी वर्दळ याठिकाणी असते.

आगारातील वाहक, चालक आणि कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांनी उपोषण आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारने राज्यातील जनतेला अनेक वायदे केले होते. मात्र हे ठाकरे सरकार सर्व आघाड्यांवर अपयशी ठरले. त्याचप्रमाणे एसटी कर्मचारी आणि प्रवाशांच्या बाबतीतही तेच घडले आहे. ठाकरे सरकारच्या निष्क्रिय कारभामुळे सर्व जनता चिंतीत झाली आहे. या काळात एसटी कमर्चारी आत्महत्या करू लागला आहे आणि त्याच्या कुटुंबाचा मोठा आधार हरपला जात आहे, असे असतानाही राज्य सरकार फक्त बघ्याची भूमिका घेत आहे, असे सांगतानाच आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य सरकारच्या निष्क्रिय कारभाराचा यावेळी निषेध व्यक्त केला.

राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांनी कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची भूमिका घेणे क्रमप्राप्त होते मात्र ते कर्मचाऱ्यांना न्याय न देता कामावर रुजू व्हा नाही तर कारवाईची धमकी देत आहेत. मुळातच राज्य सरकारची हि भूमिका अन्यायकारी आहे, अशी प्रतिक्रिया राज्यभरातून येत आहे.

## शेतकऱ्यांचा एल्गार! मुंबईत होणार भव्य महापंचायत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारच्या तीन कृषी कायद्यांविरोधात विविध शेतकरी संघटना २६ नोव्हेंबर २०२० पासून दिल्लीच्या सीमांवर आंदोलन करत आहेत. केंद्र सरकारविरोधातील शेतकऱ्यांच्या या आंदोलनाला एक वर्ष पूर्ण होण्यासाठी अवघे काही दिवस उरले आहेत. आंदोलनाला एक वर्ष पूर्ण होत असताना शेतकरी संघटनांच्या संयुक्त मोर्चाने आंदोलनाची पुढील दिशा जाहीर केली. याची घोषणा मंगळवारी करण्यात आली. मुंबईपासून ते दिल्लीपर्यंत केंद्र सरकारला घेरणार असल्याची घोषणा संयुक्त किसान मोर्चाने केली आहे.

सरकारवर दबाव वाढवण्यासाठी हिवाळी अधिवेशनात संसदेजवळ निदर्शने करण्यात येणार आहेत. येत्या २९ नोव्हेंबरपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर संयुक्त किसान मोर्चा २९ नोव्हेंबरपासून रोज ५०० शेतकरी ट्रॅक्टर–ट्रॉलीमध्ये भरून शांततेने संसदेजवळ आंदोलन करणार आहेत. पंजाब, हरयाणा, राजस्थान, उत्तराखंड आणि यूपीमधील शेतकरी २६ नोव्हेंबरला मोठ्या संख्येने दिल्ली सीमेवर पोहोचतील आणि सभांमध्ये सहभागी होतील. यानंतर २८ नोव्हेंबरला मुंबईतील आझाद मैदानावर शेतकऱ्यांची महापंचायत होणार आहे, अशी माहिती संयुक्त किसान मोर्चाकडून देण्यात आली. संसदेच्या पावसाळी अधिवेशनावेळीही प्रशासनाच्या परवानगीने शेतकऱ्यांनी जंतर–मंतरवर निदर्शने केली होती. शेतकरी संघटनांच्या आंदोलनाला २६ नोव्हेंबरला एक वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने दिल्लीच्या तिन्ही सीमांवर एकत्र येण्याचे आवाहन संयुक्त किसान मोर्चाने केले आहे. या दिवशी देशभरात निदर्शने करण्याची घोषणाही करण्यात आली आहे.

## संक्षिप्त...

### मुख्यमंत्री ठाकरेंवर लवकरच होणार शस्त्रक्रिया?

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना गेल्या आठवड्याभरापासून मानचे दुखणे आणि मणक्याचा त्रास सुरु झाला आहे. संध्या त्यांच्यावर घरीच उपचार सुरू करण्यात आले असून येत्या दोन ते दिन दिवसात त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली जाण्याची शक्यता आहे. मानेजव–ळील मणक्यावर ही शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना गेल्या आठवड्यापासून हा त्रास सुरू झाला आहे. सोमवारी संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचे भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. त्यावेळी ते मानेला पट्टा लावून बसले असल्याचे दिसत होते. त्यानंतर त्यांना मानेचा त्रास सुरू झाल्याचे स्पष्ट झाले. हा त्रास सुरू झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी काही तपासण्या करून घेतल्या. तसेच काही शारीरिक तपासण्याही त्यांनी केल्या. त्यानंतर त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागेल, असे डॉक्टरांनी सांगितले आहे. गिरगावमधील एच. एन. रिलायन्स रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. येथे प्रसिद्ध स्पाइन सर्जन शेखर भोजराज हे मुख्यमंत्र्यांवर शस्त्रक्रिया करतील असे सांगितले जात आहे.

# पत्नीनेच केले बिल्डर्स पतीचे फिल्मी स्टाईलने अपहरण

## ३६ तासातच गोव्यातून केली सुटका ; पत्नीसह सात आरोपींना अटक

**दै.रायगड नगरी । उरण**

प्रापर्टीच्या वादातून व पत्नीला सोडून दुसऱ्या महिलेसोबत मौजमजा करणाऱ्या पतीलाच संतप्त झालेल्या पत्नीनेच सहकाऱ्यांच्या मदतीने फिल्मी स्टाईलने अपहरण केल्याची घटना न्हावाशेवा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. अपहरणाच्या तक्रारीनंतर पोलिसांनी ३६ तासातच शिताफीने तपास करीत गोव्यातुन तीन महिलांसह पाच इसमांना अटक करुन अपहरण झालेल्या पतीची पोलिसांनी सुखरूपपणे सुटका केली आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार विजयाराजन चेट्टीयार (४५) हे मुळचे तामिळनाडू राज्यातील रहिवासी आहेत.विजय राजन बिल्डर्स ण्ड डेव्हलपर्स नावाची कंपनी असून नवी मुंबई सीवुड येथे त्यांचे कार्यालय आहे.तसेच नवीमुंबईतच ते मागील काही वर्षांपासून वास्तव्यास आहेत. त्याची विवाहित पत्नी अलगु मिनाक्षी विजयाराजन चेट्टीयार तामिळनाडू येथेच वास्तव्यास आहे. पती–पत्नीत छोट्या मोठ्या गोष्टींसाठी व मालमत्तेसाठी वादविवाद होत होते. पती–पत्नीत बेबनाव निर्माण झाल्याने अखेर त्यांनी तामिळनाडू येथील न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. घटस्फोटाच्या अर्जावर अद्यापही न्यायालयाने निकाल दिलेला नाही.

मात्र मालमत्तेचा वाद संपुष्टात आलेला नसतानाही आणि घटस्फोटाचा न्यायालयात खटला सुरू असतानाही विजयाराजन चेट्टीयार हे नवीमुंबईत एका महिलेसोबत रिलेशनशिपमध्ये राहात आहेत. एका महिलेसोबत रिलेशनशिपमध्ये राहात असल्याची कुणकुण पत्नी अलगु मिनाक्षी यांना लागली होती. त्यामुळे संतप्त झालेल्या पत्नीनेच आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने पतीचेच अपहरण करून अद्दल घडवण्यासाठी कट रचला. पत्नी अलगु मिनाक्षी हिने नवी मुंबई गाठली. आपल्या दोन महिला सहकारी नागेश्वरी मुरुगन आसारी आणि रिहाना अन्सर भाषा यांना मालमत्ता खरेदी करण्याच्या नावाखाली बनावट गिऱ्हाईक बनवून पती विजयाराजन चेट्टीयार यांच्या सीवूड येथील कार्यालयात पाठविण्यात आले.

न्हावाशेवा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घडलेल्या अपहरणाची प्रापर्टी दाखविण्यासाठी विजयाराजन हे उलवे येथील खारकोपर येथे दोन महिलांना घेऊन आले होते. त्याचवेळी दबा धरून बसलेल्या अपहरणकर्त्यांनी दोन महिलांच्या मदतीने बिल्डर्स विजयाराजन यांचे अप-हरण करून गोव्याच्या दिशेने गाडीतून पलायन केले. कार्यालय बंद होण्याची वेळ झाली तरी विजयाराजन परतले नाहीत. तसेच उशिरापर्यंत घरी परत न आल्याने अखेर दुसऱ्या दिवशी न्हावा-शेवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

तक्रार दाखल होताच गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या आदेशाने वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर भटे यांनी सपोनि एस.बी निकम, पोलिस हवालदार व्हि.व्ही. शिंदे, वैभव शिंदे, पोलिस नाईक संजय सपकाळ, गणेश सांबरे, विकास जाधव आदी सहकाऱ्यांसह दोन पथके तयार करून घटनास्थळी धाव घेऊन तपासाला सुरुवात केली. परिसरातील सीसीटीव्हीच्या टिव्हीचे फुटेज तपासताना बोलेरो जीपमधून विजयाराजन यांचे अपहरण झाल्याची माहिती पुढे आली. विजयाराजन यांचा मोबाईल नंबरवरुन मिळालेले लोकेशन आणि तांत्रिक बाबींचा आधार घेऊन केलेल्या तपासात अपहरणकर्ते पिडीत व्यक्तीला कलिगुंट– गोवा येथे घेऊन गेल्याचे निदर्शनास आले.

न्हावा–शेवा पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वेळ न दवडता खासगी वाहनाने लागलीच गोवा गाठले. तेथूनही निसटण्याच्या तयारीत असलेल्या अपहरणकर्त्यांचा पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग केला. पुन्हा महाराष्ट्राच्या दिशेने निघालेल्या अपहरणकर्त्यांची जीप कणकवली पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी थांबताच पोलिस पथकांनी अपहरणकर्त्यांवर झडप घालून जेरबंद केले. गाडीत बांधून ठेवलेल्या पीडिताचीही अपहरणकर्त्यांच्या तावडीतून शिताफीने सुटका केली. याप्रकरणी अवघ्या ३६ तासातच पोलिसांनी आरोपींना जेरबंद केले असल्याची माहिती व.पो.नि. मधुकर भटे यांनी दिली. पोलिसांच्या उल्लेखनीय कामगिरीचे वरिष्ठांसह परिसरातुनही कौतुक केले जात आहे.

# महानगरपालिका पोटनिवडणुकांसाठी १२ नोव्हेंबरला प्रारूप मतदार याद्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विविध सहा महानगरपालिकांमधील रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी १२ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. त्यावर १६ नोव्हेंबर २०२१ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज येथे दिली.

मदान यांनी सांगितले की, भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या व १ नोव्हेंबर २०२१ रोजी अस्तित्वात आलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या याद्या या पोटनिवडणुकांसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत. त्या प्रभागनिहाय विभाजित केल्यानंतर १२ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रारूप स्वरूपात प्रसिद्ध करण्यात येतील. त्यावर १६ नोव्हेंबर २०२१ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. त्यानंतर १७ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. २२ नोव्हेंबर २०२१ रोजी मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध केल्यानंतर २३ नोव्हेंबर २०२१ रोजी मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील.

प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. हरकती व सूचनांच्या अनुषंगाने केवळ मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या करण्यात येतात, अशीही माहिती श्री. मदान यांनी दिली.

**विविध महानगरपालिकानिहाय रिक्त पदे :** धुळे- ५ब, अहमदनगर- ९क, नांदेड-वाघाळा- १३अ, मीरा-भाईंदर- १०ड आणि २२अ, सांगली-मिरज-कुपवाड- १६अ आणि पनवेल- १५ड.

# पनवेल एसटी स्टँड परिसरात इसमाची ९० हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल एसटी स्टँड परिसरात एका इसमाच्या गळ्यातील व हातातील सोन्याची चेन व अंगठी असा मिळून जवळपास ९० हजारांचा ऐवज फसवणूक करून एक अज्ञात इसम घेऊन गेल्याची घटना घडली आहे.

भगवान गायकवाड (वय–५४, धंदा–रिक्षाचालक) हे पनवेल एसटी स्टँड विसावा हॉटेल समोरील रस्ता ते कळंबोली गाव दरम्यान यातील आरोपी इसमाने त्यांच्या गळ्यातील व हातातील सोन्याची चेन व अंगठी हे दागिने सँपल म्हणून वजन काट्याच्या मशिनवर ठेवण्याच्या बहाण्याने फसवणूक करून तो इसम निघून गेला आहे.

सदर इसमाचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, उंची ५ फूट ७ इंच अंदाजे, डोक्यावरील केस बारीक काळे, चेहरा उभट, नाक सरळ, मराठी भाषा अवगत असून अंगात चौकोनी रंगाचा फूल बाह्यांचा शर्ट व राखाडी रंगाची फूल पँट घातली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


### शासनात विलीनीकरणाच्या मागणीवर आंदोलक ठाम

# सलग दुसऱ्या दिवशीही एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरूच

## वर्कशॉपच्या शेकडो लोकांचा देखील आजपासून संपात समावेश

**दै.रायगड नगरी । पेण**

कालपासून एसटी महामंडळाच्या कामगार संघटनांनी राज्यभर संपाचा निर्णय घेतल्याने वाहतुकीची घडी पूर्णपणे विस्कटली गेली होती आणि त्याचा सर्वात जास्त फटका हा एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसला आहे. मात्र तरी देखील हे संप आजही सलग दुसऱ्या दिवशी सुरूच असून एसटी कामगार संघटना आपल्या मंडळाला शासनात विलिनीकरण करण्याच्या मागणीवर ठाम आहेत. दरम्यान आजच्या दुसऱ्या दिवशी



एसटी डेपोतील वर्कशॉपच्या जवळपास दोनशे कर्मचाऱ्यांनी देखील संपात सहभाग घेतला आहे.

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचा तुटपुंजा पगार आणि त्यांना मिळणाऱ्या तुरळक सवलतींपासून एसटी कर्मचारी हैराण झाले असून त्यांनी दिवाळीपूर्वी बेमुदत उपोषणाचा पवित्रा घेतला होता, मात्र आलेला दिवाळी सण लक्षात घेता आणि आंदोलनातील

.../२

### पोलादपूर-तुर्भे बुद्रुक येथे शिवसेनेमध्ये जाहिर प्रवेश

# ...तर आरे ला कारे उत्तर मिळेल : आ.भरत गोगावले

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील सर्वात राजकीयदृष्ट्या प्रवाही असलेल्या तुर्भे पंचक्रोशीतील विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यासोबतच आ.भरत गोगावले यांच्या नेतृत्वावर दृढविश्वास दर्शविण्यासाठी परिसरातील नागरिकांनी शिवसेनेमध्ये जाहिर प्रवेश केला. यावेळी शिवानी महिला बचत गट स्वस्त धान्य दुकानाचा आमदार गोगावले यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.



यावेळी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, पोलादपूर शहर प्रमुख सुरेश पवार, उपतालुकाप्रमुख शौकत कार्लेकर, विभाग प्रमुख अनिल भिलारे, लक्ष्मण मोरे, दशरथ उतेकर तसेच विभागातील शिवसेनेचे आजी माजी पदाधिकारी, शिवसैनिक इत्यादी उपस्थित होते. पोलादपूर तालुक्यातील तुर्भे बुद्रुक येथील शेकडो महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांनी आमदार भरतशेठ गोगावले यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

.../२

# स्तुत्य हेतू; परंतु...

देशव्यापी नोटबंदीच्या निर्णयाला बघता बघता पाच वर्षे झाली. अर्थव्यवस्थेच्या मजबुतीसाठी कठोर पावलांची गरज असते. आधी उत्सुकता, मग धावपळ, त्यानंतर नाराजी आणि शेवटी प्रचंड अव्यवस्थेतून संताप ही नोटबंदीनंतरच्या अनुभूतीची क्रमवारी होती. अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम करणारा महत्त्वाचा निर्णय एखाद्या पंतप्रधानांनी दूरचित्रवाणीवरून अचानक जाहीर करण्याची अलीकडच्या काळातील ती पहिलीच वेळ. या घोषणेने देशात वादळ आले. 'मी देशाला फक्त पन्नास दिवस मागितले आहेत. ३० डिसेंबरनंतर कमतरता जाणवली किंवा माझा हेतू चुकीचा असल्याचे लक्षात आले, तर म्हणाल त्या चौकात उभे राहून देशाने दिलेली शिक्षा भोगण्यास मी तयार असेन,' असे आवाहन करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री आठ वाजता पाचशे आणि हजाराच्या नोटांवर बंदी घातली. सामान्यांच्या भल्याचा दावा झाल्यानंतरही या निर्णयाचा मोठा जाच सामान्यांच्याच वाट्याला आला. प्रवासातील अडथळ्यांपासून कौटुंबिक समारंभांपुढील आव्हानांचा सामना करावा लागला. लोकांनी एटीएमपुढे रांगा लावल्या. आधी मुकाट्याने आणि पुढे निषेध करीत सर्वांनी कळ सोसली. काश्मीर; तसेच ईशान्य भारतात दहशतवादाला चालना देण्यासाठी वापरात येणारे चार ते पाच लाख कोटी रुपयांचे चलन हद्दपार करण्यासाठी नोटबंदी केल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. प्रत्यक्षात नोटबंदीमुळे देशाच्या आर्थिक विकास दरात हानी झाल्याची टीका सोसावी लागली. केंद्रीय अर्थ खात्याच्या संसदीय स्थायी समितीनेही नोटबंदीवर आक्षेप घेतल्याचे बोलले गेले. ही संघटित लूट असल्याची टीका वरिष्ठ अर्थतज्ज्ञ, माजी पंतप्रधान डॉ. मनमोनसिंग यांनी केल्यानंतर, मोदी सरकारविरोधात वातावरण आणखीच तापले. नोटबंदीतून नोकऱ्यांवर संक्रांत आल्यामुळे केंद्र सरकारचा समाचार घेणाऱ्या संघटनांमध्ये संघ परिवारातील शीर्षस्थ कामगार संघटनेचाही समावेश होता. शंभराहून अधिक लोकांच्या मृत्यूचे खापर विरोधकांनी सरकारच्या माथी मारले. नक्षलवाद्यांचे आर्थिक स्रोत रोखण्यासाठी नोटबंदीने महत्त्वाची भूमिका पार पाडली, असे सरकारतर्फे सांगितले गेले होते. पाच वर्षांत नक्षलवाद्यांची कोंडी झाल्याचे प्रभावी चित्र मात्र देशाला दिसलेले नाही. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, तेव्हा पाचशे आणि हजारांच्या एकूण १५ लाख ४१ हजार कोटींच्या नोटा चलनात होत्या. त्यातील १५ लाख ३१ हजार कोटी रुपये बँक व्यवस्थेत परत आले. हा आकडा ९९.३ टक्के एवढा होतो. म्हणजेच अंदाजे दहा हजार कोटी रुपयांचा परतावा झालेला नाही. देशाने पाच वर्षांत ऑनलाइन व्यवहारांमध्ये कमालीचा वेग आत्मसात केला, ही वास्तविकता आहे. करोनाकाळाचा आढावा घेतला, तर मागील वर्षभरात नगदी नोटांचा व्यवहारही आडेआठ टक्क्यांनी वाढला आहे. नोटबंदीच्या वेळी १७.७४ लाख कोटी रुपये चलनात होते. सध्या हा आकडा २९.१७ लाख कोटींवर आहे. पंतप्रधानांनी व्यापक स्तरावर लागू केलेल्या 'जन धन योजने'ने कोट्यवधी सामान्यांना बँक खातेदारांचा दर्जा दिला; तसेच देशभरात कर भरणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली, याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. नोटबंदीचा हेतू चांगला असला, तरी अंमलबजावणीतील घाई आणि एककल्लीपणा आक्षेपार्ह होता. पंचवार्षिक सिंहावलोकनातून ते लक्षात येते. सामान्यांची ससेहोलपट कमी करण्याचे पद्धतशीर नियोजन केंद्राला नक्कीच करता आले असते. आता पाच वर्षांनंतर सरकारने काही चुकांची कबुली द्यायला हरकत नसावी. विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन देशहिताचे निर्णय राबविण्याचा पायंडा मोदी सरकारला अद्यापही रुजविता आलेला नाही. ज्या सरकारमध्ये स्वपक्षातील वरिष्ठ महत्त्वाच्या निर्णयांबद्दल कमालीचे अनभिज्ञ असतात, तिथे विरोधकांच्या विश्वास संपादनाच्या गोष्टींना वाव नाही. निवडणुकांचे निकाल पारड्यात टाकून सामान्यांनी नरेंद्र मोदींना पसंती दिली. नोटबंदीच्या अंमलबजावणीत शंभर टक्के अचूकता होती, असा निष्कर्ष मात्र त्यातून काढला जाऊ शकत नाही. बाजारपेठेतून काळा पैसा संपलेला नाही. भ्रष्टाचार कमी झालेला नाही. दहशतवाद थांबलेला नाही. अर्थव्यवस्थाही कॅशलेस झालेली नाही. मोदींचा स्वकर्तृत्वावर अतिशय विश्वास आहे. देशातील जनता त्यांना जाब विचारत राहील. नोटबंदीने असे रातोरात चमत्कार घडणारही नव्हते. अतार्किक दाव्यांचा सर्वांगीण विश्वासार्हतेवर परिणाम होतो. निर्णयांचा अधिकार विशिष्ट व्यक्तीकडे एकवटला, तर बहुमताचा आदर करण्याच्या संकल्पनेलाच नख लागते. असे असले, तरी देशाच्या हितासाठी केलेला धाडसी प्रयोग म्हणून नोटबंदीकडे बघायला हवे. पाच वर्षांत अर्थव्यवस्था सावरली आहे. लोकांचा रुसवाही निवळला आहे. नोटबंदी म्हणजे गोपनीयता बाळगून शत्रूराष्ट्रावर केला जाणारा 'सर्जिकल स्ट्राइक' नव्हे. भविष्यात असे आकस्मिक अस्त्र निर्दोष सर्वसामान्यांवर लादले जाऊ नये, हीच देशवासीयांची अपेक्षा असेल.

# मनसे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर यांचे आजपासून आमरण उपोषण

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणादरम्यान वाहतुकीच्या नवीन समस्या आणि गैरसोयी निर्माण झाल्या असून यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी जाहिर केलेले आमरण उपोषण आज, बुधवार, दि. १० नोव्हेंबर २०२१ पासून सुरू होत आहे. प्रशासनाने दर्पण दरेकर यांना या उपोषणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करण्यासाठी आयोजित केलेली चर्चेची बैठक निष्फळ ठरल्याने दरेकर यांनी उपोषणाच्या निर्णयावर ठाम असल्याचे जाहिर केले.

पोलादपूर शहरातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग अंडरपास स्वरूपाचा व बॉक्स कटींग पध्दतीचा होत असून यातील नियोजनाअभावी सद्यस्थितीत तसेच भविष्यातही पोलादपूरवासियांची मोठी गैरसोय होणार आहे. यासंदर्भात विविध संस्था व व्यक्तींनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे केलेले प्रयत्न महामार्ग बांधकाम विभागाने सातत्याने दूर्लक्षित करून मनमानीपणे ठेकेदार कंपनीने नियोजन आराखड्यात नसलेल्या पुलांचे बांधकाम सुरू केले आहे आणि आवश्यक तिथे बांधकाम करण्याऐवजी काही बाधितांच्या आग्रहाला बळी पडून मंजूर आराखड्याखेरीज अधिक पुल बांधणी केली आहे. सर्व्हिस रोड अरूंद आणि निर्धारित अंतर लांबीचे करण्याचे हेतूपुरस्सरपणे ठेकेदार कंपनीने टाळले आहे. त्यामुळे पोलादपूर शहरातील प्रभातनगर पूर्व, भैरवनाथ नगर, आनंदनगर तसेच पोलादपूर शहरातील नागरिकांना छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यापासून वळसा घालून पुर्वेकडील सर्व्हिसरोडवरून पश्चिमेकडील सर्व्हिस रोडवर जाऊन प्रवास करावा लागणार आहे तसेच पश्चिमेकडील सर्व्हिस रोडलगतच्या गोकुळनगर, घाटेआवाड, तांबडभुवन, खरेदी विक्री संघ, पंचायत समिती आणि रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थी यांच्यासाठी पोलादपूर शहरामध्ये अथवा एस.टी.स्थानकाकडे येण्यासाठी द्रविडी प्राणायाम करण्याची वेळ ओढवणार आहे.

यासंदर्भात, महाड येथील राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम यांना पोलादपूर शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी मनसेचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष चेतन उतेकर, पंकज उमासरे, दीपक चव्हाण, चंद्रहास नगरकर यांच्यासमवेत भेटून इशारावजा निवेदन दिले. या निवेदनानुसार कोणतीही उपाययोजना न करता इशारा देणाऱ्यास आमरण उपोषणापासून परावृत्त करण्याचे सोपस्कार पूर्ण करण्यासाठी पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये तहसिलदार दिप्ती देसाई यांच्या अध्यक्षतेखाली उपकार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम, कनिष्ठ अभियंता म्हाडकर आणि सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या उपस्थितीत मनसे शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांना चर्चेस निमंत्रित करून बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी दर्पण दरेकर यांनी श्रीकाळभैरवनाथ देवस्थानासमोर दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी तसेच गुरे जनावरे यांच्यासाठी व्हेईक्युलर अथवा कॅटल अंडरपास उभारण्याची मागणी केली. यावेळी मंजूरीविना पुल उभारणाऱ्या ठेकेदार कंपनी आणि कंपनीच्या आर्थिक कामावर लक्ष ठेवणाऱ्या कंपनीला काळ्या यादीत टाकण्याच्या मागणीबाबत कनिष्ठ अभियंता म्हाडकर यांनी विषयांतर करू नका, असा आग्रही सूर धरला.

मात्र, कोणतेही समाधान न करताच राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या उपकार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम यांनी परावृत्त करण्याचा असफल प्रयत्न करून सोपस्कार पूर्ण केल्याने मनसे शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी आमरण उपोषणाच्या इशाऱ्यानुसार बुधवारी सकाळी साडेदहा वाजल्यापासून सुरूवात करणार असल्याचे ठामपणे सांगितले. यावेळी मनसे अध्यक्ष दर्पण दरेकर यांनी पोलादपूर या तालुक्याचे प्रमुख शहर असलेल्या ठिकाणी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांबाबत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ आमरण उपोषणाद्वारे नागरिकांच्या समस्यांवर समाधान निघेपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे जाहिर केले आहे. यावेळी पोलादपूर तालुक्यातील जनतेने उपस्थित राहून सहकार्य करण्याचे आवाहनही दर्पण दरेकर यांनी केले आहे.

# कल्याण डोंबिवलीत गरोदर मातांची सोनोग्राफीसाठी परवड

**दै.रायगड नगरी । बाबुराव खेडेकर**

**कल्याण** : स्मार्ट सिटी बनण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आरोग्य सेवेकडे अक्षम्य दुर्लक्ष होताना दिसत आहे. गरोदर महिलांच्या सोयीसाठी एकही सोनिग्राफी सेंटर मनपा क्षेत्रात नसल्याने खाजगी सोनोग्राफी सेंटर्सचे उखळ पांढरे होत आहे व गोरगरीब जनतेला नाहक वाढीव पैशासाठी नागवले जात आहे. त्यामुळे डोंबिवली येथील शास्त्रीनगर रुग्णालयात व कल्याण मधील रुक्मिणी रुग्णालयात तात्काळ सोनोग्राफीची सोय उपलब्ध करावी अशी आग्रही मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.

कल्याण डोंबिवली मनपा हद्दीतील नागरिकांना आरोग्य सेवेसाठी ठाणे मुंबई तसेच उल्हासनगर कडे पाहावे लागते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही अशी परिस्थिती गरोदर मातांच्या बाबतीत सध्या कडोंपामध्ये सध्या आहे. कोरोना महामारीमुळे कंबरडे मोडलेल्या नागरिकांना महागड्या खाजगी आरोग्य सेवेचा भुर्दंड पडत आहे. गरोदर महिलांना ९ महिन्यात चार वेळा सोनोग्राफी करून घ्यावी लागते ज्यामध्ये अर्भकाच्या वाढीबाबतचा अभ्यास केला जातो. उल्हासनगर मधील धर्मादाय रुग्णालयात ज्या सोनोग्राफीला १००० रुपये घेतले जातात त्याच सोनोग्राफीला कल्याण डोंबिवलीतील खाजगी सोनोग्राफी सेंटरमध्ये २५०० रुपये आकारले जातात. सर्वसामान्य नागरिक नजीकच्या नागरी आरोग्य केंद्रात डॉक्टरांच्या सल्ल्याने गर्भवती मातांची प्रसूतीसाठी नावनोंदणी शास्त्रीनगर किंवा रुक्मिणी रुग्णालयात करतात मात्र दोन्ही ठिकाणी सोनोग्राफीची व्यवस्था नाही. शास्त्रीनगर रुग्णालय प्रसूतीसाठी कडोंपा हद्दीत खूपच सुपरिचित आहे मात्र येथील पॅथॉलॉजीचे व्यवस्थापन पुण्याच्या श्री कृष्णा डायग्नोस्टिक या खाजगी संस्थेकडे दिले आहे. या संस्थेशी संपर्क केला असता सोनोग्राफीची सुविधा सध्या उपलब्ध नाही असे सांगितले जाते. परिणामी नागरिकांना खाजगी सोनोग्राफी सेंटर कडे जावे लागते व मागेल तेवढि रक्कम देऊन निदान करावे लागते. कल्याण डोंबिवलीच्या ग्रामीण भागातील व प्रलंबित २७ गावातील आरोग्य सुविधेबाबत अशीच रामभरोसे परिस्थिती पाहायला मिळते.

कल्याण डोंबिवली मनपा हद्दीत खाजगी रुग्णालये व पॅथॉलॉजीचे पेव फुटले आहे. अनेक धर्मादाय संस्थाही या स्पर्धेत उतरल्या आहेत. मात्र डायग्नोस्टिक केंद्राच्या खर्चावर नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे रोग निदान चाचण्यांचा खर्च मेडिक्लेम मध्ये दिला जात नाही असेही समोर येत आहे. वाढत्या महागाईचे कारण देत नुकतेच सर्व खाजगी रोग निदान केंद्रानी सर्वच चाचण्यांचे दर वाढवले आहेत. सर्वसामान्य करदात्या नागरिकांची रास्त भावात चांगली आरोग्यसेवा मिळावी इतकी माफक अपेक्षा असते मात्र त्यांचा अपेक्षाभंग तेंव्हा होतो जेव्हा त्यांना हव्या त्या चाचण्या सरकारी रुग्णालयात होत नाहीत व याच परिस्थितीचा फायदा खाजगी रुग्णालये घेतात. कोरोना विरुद्ध उत्तम लढा दिलेल्या कडोंपाने गरोदर महिलांच्या आरोग्यसेवेकडे वेळीच लक्ष दिले पाहिजे व त्यांचा लांबचा जीवघेणा प्रवास टाळून जवळपासची सोनोग्राफी सुविधा उपलब्ध व्हायला पाहिजे.

> आशा वर्कर सुद्धा डायलिसिस सुविधा खाजगी मध्ये घ्या असाच सल्ला देतात त्यामुळे आमचा नाईलाज होतो. आयुक्तांनी याकडेसुद्धा थोडे लक्ष द्यायला हवे.
>
> **ज्योती केसरकर, गर्भवती महिला, चिंचपाडा, कल्याण**



श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव समुद्र किनाऱ्यावरील नयनरम्य दृश्य. (छाया - अमेय नाझरे, बोर्ली पंचतन)

# पाली खोपोली रुंदीकरण बाधित शेतकरी न्यायालयात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड शेतकरी संघर्ष समन्वय समितीच्या नेतृत्वात पाली खोपोली राज्यमहामार्ग रुंदीकरण बाधीत शेतकरी आपल्या न्यायहक्कांसाठी सातत्याने लढा देत आहेत. समितीचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांच्या नेतृत्वात व शेकडो शेतकऱ्यांच्या सहभागाने विविध प्रकारची आंदोलने करून देखील सरकारकडून शेतकऱ्यांच्या मागणीवर अद्यापही तोडगा निघत नसल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. आता शेतकऱ्यांनी आपल्या प्रश्नावर न्यायालयात धाव घेतलीय.

वाकण पाली खोपोली राज्य महामार्ग बेकायदा जमिनी अधिग्रहणावर महाराष्ट्र शासन व इतरांच्या विरोधात बाधित शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून कायदेशीर लढ्याला प्रारंभ केला आहे. महामार्ग रुंदीकरण बाधित शेतकरी सचिन गजानन तेलंगे, पांडुरंग लिंबाजी तेलंगे, गिरीश सीताराम काटकर यांनी ५४८ ए वाकण पाली खोपोली राष्ट्रीय महामार्ग बेकायदा जमिनी अधिग्रहण संदर्भात महाराष्ट्र शासन, सचिव, पिडब्लू डी, जिल्हाधिकारी रायगड,तहसीलदार सुधागड, एस. डी. ओ, एम.एस.आर.डी. सी यांचे विरुद्ध जिल्ह्यातील सुधागड, खालापूर, व रोहा तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी रस्ता दुपदरी महामार्गासाठी बेकायदेशीरपणे, कोणताही मोबदला न देता जबरदस्तीने वापरल्या जात आहेत. या रस्ता रुंदीकरण कामविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका स्टॅम्प नंबर २१६०० /२०२१ वकील आर एन कच्छवे यांच्या मार्फत दाद मागितली आहे. सदर प्रकरणी विविध पुढारी,आमदार, मंत्री, खासदार यांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार, एम.एस.आर.डी. सी यांनी सन २०१७ पासून आजतागायत केवळ बैठका आयोजित करून त्याचे मिनिट नोंद करण्याशिवाय काहीही केलेले नाही व सदर जमिनी सन १९७४ सालीच अधिग्रहित केलेल्या आहेत असा निर्णय घेऊन बाधित शेतकऱ्यांवर अन्याय केला असल्याची भूमिका याचिकाकर्त्यांनी मांडली आहे.

शिवाय या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता जबरदस्तीने रुंदीकरण केले जात असल्याने शेतकऱ्यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून न्यायाची अपेक्षा केलीय. सदर याचिका नोव्हेंबर २०२१ चे तिसऱ्या आठवड्यामध्ये माननीय उच्च न्यायालय मुंबई चे मुख्यन्यायाधीश व मा.न्यायाधीश एम एस कर्णिक यांचे खंड पिठासमोर सुनावणीस येण्याची शक्यता वर्तवली जातेय. पाली खोपोली राज्यमहामार्ग बाधीत शेतकऱ्यांना भूसंपादन प्रक्रियेत योग्य तो मोबदला व जलद नुकसानभरपाई मिळावी अशी जोरदार मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली आहे.

# मुरुडमध्ये ग्रामसेवकांचे कामबंद आंदोलन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

औरंगाबाद (पश्चिम) मधील आमदार संजय शिरसाट यांनी ग्रामसेवकाबद्दल अपशब्द वापरल्यामुळे भावना दुखावल्या असून त्याचे तीव्र पडसाद उमटत असून महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन तर्फे मुरुड मध्ये तालुक्यातील ग्रामसेवक संघटनेच्या वतीने तालुका अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी यांना एक निवेदन सादर करण्यात येऊन घटनेचा जाहीर निषेध व्यक्त करीत कामबंद आंदोलन केले.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार व मुख्य सचिव यांना महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन डी.एन.ई.१३६ अध्यक्ष एकनाथराव ढाकणे व सरचिटणीस प्रशांत जामोदे यांनी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,दि.८ नोव्हेंबर रोजी औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या महिला सरपंच परिषदेत आमदार संजय शिरसाट यांनी आपला तोल सोडून केलेल्या भाषणात ग्रामसेवकांबद्दल शिविगाळ, अर्वाच्च भाषा वापरली.यामुळे राज्यातील २२००० ग्रामसेवकांच्या भावना तीव्र झाल्या आहेत.लोकप्रतिनिधी असे वक्तव्य कसे करु शकतात ? त्यांना भानावर आणणे गरजेचे आहे.राज्यभर ग्रामसेवक प्रतिकूल परिस्थितीत प्रामाणिक पणे कामे करीत आहेत.आम.शिरसाट यांनी जाहीर माफी मागावी व आपले म्हणणे मागे घ्यावे.समाजात ग्रामसेवकांबद्दल चुकिचा समज गेला आहे.याबाबत समज देण्यात यावी.

यांच्या निषेधार्थ संपूर्ण महाराष्ट्रभर २२००० ग्रामसेवक काळ्या फिती लावून निषेध व्यक्त करतील आणि आज कामकाज बंद ठेवून आपला निषेध व्यक्त करतील.या घटनेने ग्रामसेवक तणावाखाली आलेले असून सरपंच व ग्रामसेवकांमध्ये तेढ निर्माण झालेली असून अविश्वासाचे वातावरण तयार झाले आहे.अशा अपप्रवृत्तीचा बिमोड होणे गरजेचे आहे.याचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात येत असून अपशब्द वापरणा-या आमदारावर भारतीय दंड संहिता नुसार फौजदारी गुन्हा नोंद करण्यात यावा. अशी मागणी आहे.अन्यथा संपूर्ण राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व तालुका पातळीवर ग्रामसेवक आंदोलन करतील.वेळप्रसंगी एक दिवसीय आंदोलनाचे रुपांतर मोठ्या आंदोलनात होईल.असे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

यावेळी ग्रामसेवक संघटनेचे तालुका अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, उपाध्यक्ष अनिल चवरकर, सचीव सुशांत ठाकूर, खजीनदार विराज माळी, चेतन मगर, संतोष नागोठकर, एम.एच.भालदार, पी.जी.गाडेकर, जे.आर. म्हात्रे, अविनाश पिंपळकर, श्रीमती सारिका भोईर, श्रीमती एस.एस.झिराडकर, श्रीमती संगीता पेडवी, श्रीमती वेदिका म्हात्रे सर्व ग्रामसेवक कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सलग दुसऱ्या दिवशीही एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरूच

काही आर्थिक बाबी मान्य झाल्यानंतर या कामगार संघटनांनी ऐन दिवाळीत प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी दिवाळीमध्ये आपली सेवा कार्यरत ठेवली होती, मात्र दिवाळी झाल्यानंतर रविवारी मध्यरात्रीपासून या संघटनांनी आपला संप पुन्हा एकदा सुरू केला आहे. इतर मागण्या जरी मान्य झाल्या असल्या तरी आमचे शासनामध्ये विलिनीकरण व्हावे या प्रमुख मागणीवर एसटी कर्मचारी संघटना ठाम आहेत. काल पेण डेपोमध्ये जे कर्मचारी संपात सामील झाले होते, त्यामध्ये आज दुसऱ्या दिवशी वाढ झाली असून हे आंदोलक अधिक आक्रमक झाले आहेत. मात्र काही केल्या आम्ही आमची ही प्रमुख मागणी मान्य करून घेतल्या शिवाय गप्प बसणार नाही. या भूमिकेवर हे आंदोलक ठाम आहेत. दरम्यान राज्य स्तरावर या मागणीबाबत चर्चा सुरू असून अजूनही यावर कोणत्याही प्रकारचा तोडगा निघाला नसल्याने सलग दुसऱ्या दिवशी देखील हे आंदोलन चालूच राहिले आहे.

## ...तर आरे ला कारे उत्तर मिळेल : आ.भरत गोगावले

दिवाळीच्या मुहूर्तावर तुर्भे खुर्द येथे विविध कामांचे भूमिपूजन व उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी तुर्भे खुर्द येथील ग्रामस्थांनी तालुक्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आणि आमदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

तुर्भे पंचक्रोशीतील जनतेने विकास कामासंदर्भात चिंता अणि काळजी करू नये. विकास कामे सातत्याने केली म्हणूनच जनतेने तीन वेळा निवडून दिले आहे. विकास कामे तर होतीलच. पण याठिकाणी जर माझ्या शिवसैनिकांना कोणी दादागिरी करण्याचा प्रयत्न करत असेल तर 'आरे ला कारे' केल्याशिवाय राहणार नाही.असा सज्जड इशारा आ.भरत गोगावले यांनी दिला.

# मा.आ.मनोहरशेठ भोईर यांचा विकास कामांचा धडाका

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख तथा उरण-पनवेल-खालापूर मतदारसंघाचे माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या प्रयत्नांतून जिल्हा नियोजन योजनेअंतर्गत उरण तालुक्यातील आवरे येथे रस्त्याचे काम व आवरे येथे हायमास्ट बसविणे कामाचे भूमिपूजन माजी आमदार मनोहरशेठ यांच्या शुभहस्ते पार पडले.तसेच कडापे येथील शाळा दुरुस्तीचे काम देखील या योजेनेअंतर्गत मंजूर झालेले आहे.

या कार्यक्रमाला शिवसेना विधानसभा संपर्कप्रमुख तथा कामगार नेते महादेव घरत, आवरे ग्रुप ग्रामपंचायत सरपंच निराताई पाटील, शाखाप्रमुख सुनिल ठाकूर, शिक्षकसेना कोकण कार्यध्यक्ष कौशिक ठाकूर, महेश गावंड, ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मनिराम पाटील, युवासेना अधिकारी अमित म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अरुण गावंड, अनिल पाटील, भाई पाटील, के.टी.गवंड, ना.क.गावंड गुरुजी, बाळकृष्ण गावंड, अरुण थळी, सोहम भोईर आदी उपस्थित होते. तसेच यावेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी आवरे गावातील स्वयंभू भोलेनाथाचे दर्शन घेतेले.रस्त्याचे व हायमास्टचे काम सुरु झाल्याने ग्रामस्थांनी माजी आमदार मनोहरशेठ भोईर व शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वै.श्रीगुरु गोपाळबाबा वाजे अलिबागकर महाराज यांचा २१ वा पुण्यस्मरण सोहळा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

श्री सद्गुरू गणपतबाबा अलिबागकर महाराज यांच्या फडाचे वंशज वै. श्री. गुरु गोपाळबाबा वाजे अलिबागकर महाराज यांचा एकोणतीसावा (२९) वा.पुण्यस्मरण मिती कार्तिक वद्य ४ शके १९४३मंगळवार दि.२३/१२/२०२१ रोजी श्री. अलिबाकर महाराज मठ, कासार घाट श्रीक्षेत्र पंढरपूर येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रम मिती कार्तिक वद्य १शके १९४३ शनिवार दि.२०/११/२१ते कार्तिक वद्य ५बुधवार दि.२४/११/२१पर्यंत साजरा करण्यात येणार असून या कार्यक्रमानिमित्ताने दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ते ६श्रींची काकड आरती भजन, सकाळी ६.३० ते ८.३०नित्यपूजा,९ते १२.३० श्री. तुकोबाराय गाथा भजन, दुपारी १ते ४भोजन, सांय.४ते ५ प्रवचन,५ते ६.३०हरिपाठ,७ते ९ हरिकीर्तन, नंतर जागरण होईल.

तसेच मिती कार्तिक वद्य ४शके १९४३मंगळवार दि.२३/११/२१रोजी महाराजांच्या पुण्यस्मरणानिमित्ताने श्रीची महापूजा अभिषेक, सकाळी ८ते १० दिंडी प्रदक्षिणा १०.३०ते १२.३० पुण्यस्मरणा निमित्ताने किर्तन,दुपारी महाप्रसाद, मिती कार्तिक वद्य ५शके १९४३बुधवार दि.२४/११/२१ रोजी सकाळी १०ते १२काल्याचे किर्तन, तसेच मिती कार्तिक वद्य ६शके १९४३गुरुवार दि.२५/११/२१ रोजी वै. ह.भ.प.सौ. मीनाताई नारायण वाजे अलिबाकर महाराज यांच्या २७ व्या. पुण्यस्मरणा निमित्ताने १०ते १२ भजन नंतर महाप्रसाद तरी भाविकांनी सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशी विनंती ह.भ.प. नारायणदादा वाजे अलिबागकर महाराज यांच्याकडून करण्यात येत आहे.

## गड-किल्ले स्पर्धेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील रोठ खु.येथे संपन्न झालेल्या दीपाळी सणाचे औचित्य साधून संपन्न झालेल्या गड- किल्ले स्पर्धेस बच्चे कंपनीचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद लाभला.

पर्यावरण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने येथील बच्चे कंपनीच्या कला गुणांना वाव मिळवून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या गड-किल्ले स्पर्धेत रोठ खु.येथील मोठ्या संख्येने स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला.तर या स्पर्धेत सुयश संपादित केलेल्या स्पर्धकांना जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते किशोर मोरे, हरिश्चंद्र मोरे, लक्ष्मण मोरे, राकेश मोरे, सचिन मोरे,अप्पा मोरे, प्रकाश डाके, स्वामी मोरे, ओमकार मोरे आदी मान्यवर मौडळींकडून सन्मानचिन्ह व अन्य बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. तर गड-किल्लयांची माहिती होऊन आपला ऐतिहासिक वारसा जपला जावा या उद्देशाने सदरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली.

# एसटीचा संप; प्रवाशांची गैरसोय व खोळंबा, खाजगी वाहनांची लूट



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे ऐन दिवाळीची सुट्टी संपून निघालेले प्रवाशी व चाकरमान्यांचे पुरते हाल झालेले दिसले. अशावेळी प्रवाश्यांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागला. त्यामुळे अनेक खाजगी वाहतूक दारांनी अव्वाच्या सव्वा दर लावून प्रवाशांची लूट केली.

मंगळवारी (ता.९) व सोमवारी (ता.८) मुंबई गोवा महामार्गावर तसेच इतर मार्गांवरील बस थांबे व नाक्यांवर वाहनांची वाट बघत प्रवासी तासनतास उभे होते. वृद्ध व महिलांचे खुप हाल झाले. प्रवाश्यांना अधिकचे पैसे देऊन खाजगी गाड्यांचा आधार घ्यावा लागला. पाली ते खोपोली फाटा या ३० किमी अंतरासाठी खाजगी वाहने ८० ते १०० रुपये घेत होते. तर खोपोली फाटा ते लोणावळा या अवघ्या ८ ते ९ किमी अंतरासाठी खाजगी वाहने तब्बल ८० रुपये घेत होते. लांब पल्ल्याच्या ठिकाणी तर भरमसाठ पैसे आकारले जात होते. एका महिलेने सांगितले की गावी जाण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावर वाकण नाक्यावर एसटी ची वाट पाहत उभे होतो. मात्र ३ तास थांबून एकही एसटी आली नाही. त्यामुळे अधिकचे पैसे देऊन खाजगी वाहनाने गावी पोहोचलो. पैसे तर गेलेच पण गैरसोय देखील झाली. गावागावात जाण्यासाठी अनेकांना मिनीडोअरचा आधार मिळाला. तर लांबच्या पल्ल्यासाठी खाजगी वाहने उपयोगी आली. या सर्व गाड्या प्रवाश्यांनी अगदी खचाखच भरुन जात होत्या. परिणामी खाजगी वाहतूकदारांचा धंदा तेजित होता. त्यांना जणू काही दिवाळीचा बोनस मिळाला. जिल्ह्यातील लांब पल्याच्या काही एसटी गाड्या सुरू होत्या. मात्र त्याही इच्छित स्थळी गेल्यानंतर तिथून पुढे जात नव्हत्या. जवळच्या थांब्यावरील प्रवाशांना देखील घेत नव्हत्या. त्यामुळे या प्रवाशांचे देखील प्रचंड हाल झाले. ज्यांना या संपाबद्दल माहित नव्हते ते प्रवासी बस स्थानकात आले होते. त्यामुळे स्थानकांवर प्रवाशांची गर्दी झाली होती. परंतु गाड्याच नाही हे समजल्यावर त्यांनी तेथून परतीचा मार्ग पकडला. जो तो मिळेल त्या वाहनांनी इच्छित स्थळी जाण्याचा प्रयत्न करत होता.

# आझाद मैदानावर सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषणाचा ३७ वा दिवस



**दै.रायगड नगरी । माथेरान**

शासकीय सेवेत आपल्या कार्यकाळ समाप्ती नंतर प्राप्त होणाऱ्या निवृत्तिवेतनासाठी राज्यातील विविध भागांतील सेवानिवृत्त कर्मचारी महत्वाचा सण असणाऱ्या दिवाळीच्या सणावर विरझण टाकून केवळ आपल्या न्याय आणि हक्कासाठी सहकुटुंब आझाद मैदानावर सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषणास बसलेले आहेत. दररोज नवनवीन कुटुंबातील सदस्य उपोषणाला बसत आहेत. आज नागपूर येथील विठोबा चिंतामण पिपरे, निता विठोबा पिपरे कु. श्रेयांशी विठोबा पिपरे,कु. वैदेही विठोबा पिपरे ही मंडळी बसली आहेत.

ऑफ्रोह या संघटनेच्या माध्यमातून ह्या उपोषणाला २ ऑक्टोबर गांधी जयंती पासून सुरुवात करण्यात आलेली आहे त्यामुळे कदाचित राज्यातील हे एक प्रकारे ऐतिहासिक आंदोलन आहे. आदिवासी समाजातील अनेकांनी शासकीय सेवेत आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. घरातील कमावती व्यक्ती शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या घरातील अन्य व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेतले जात नाही त्यामुळे संपूर्ण कुटुंब बेरोजगारीच्या छायेत असून उत्पन्नाचे काही अन्य साधन नसल्याने त्यांना जगणे मुश्कील बनलेले असतांना आयुष्यभर शासकीय सेवेत राहून सुध्दा एवढया वर्षाची ग्रॅज्युएटी मिळत नाही आणि त्यातच निवृत्तिवेतन सुध्दा सन २०१९ पासून मिळालेलं नाही. त्यामुळे अशा कुटुंबातील सदस्यांनी काय करावे हा महत्वपूर्ण प्रश्न संबंधित असलेल्या सर्व कुटुंबातील सदस्यांना सतावतो आहे. त्यामुळे सेवानिवृत्त झाल्यानंतर शेवटच्या क्षणी जगावं की मरावं याच विवंचनेत हे सर्व सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत गांभीर्याने लक्ष केंद्रित करून अशा पीडितांना न्याय मिळवून द्यावा अशी आर्त साद या सर्व कुटुंबातील सदस्यांमधून आझाद मैदानावर ऐकू येत आहे.

उपोषण कर्त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर व कल्याण तसेच महाराष्ट्रातुन ऑफ्रोहचे मावळे मोठ्या प्रमाणावर उपोषणस्थळी भेट देण्यासाठी येत आहेत. उपोषणाच्या ह्या लढाईचा शेवट या पीडितांच्या मृत्यने होणार आहे की काय असा सवाल देखील या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

# पनवेल शहरातून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरात एक ३८ वर्षीय इसम घरात कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शहरातील लाईनआळी येथे राहणारा ऋषिकेश लक्ष्मण कचरे (३८) हा इसम कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेला आहे. उंची ५ फूट ५ इंच, रंग गोरा, डोक्याचे केस काळे, चेहरा गोल, नाक सरळ, पाठीवर लाल रंगाची चामखिळ त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. त्याच्या अंगात खाकी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातली आहे.

# मा.उपमहापौर विक्रांत पाटील यांनी तत्परतेने नाल्यावरचा खड्डा घेतला बुजवून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभाग १८ मधील स्वामी नित्यानंद मार्ग ते टिळक रोड या रस्त्यावरील असलेल्या नाल्यावरचे काँक्रीट स्लॅब तुटून खड्डा पडला होता. काही जागरूक नागरिकांनी या खड्डयांमुळे कोणती ही दुर्घटना होऊ नये म्हणून खड्ड्याच्या बाजूला मोठी दगडं लावून ठेवली आणि याची माहिती कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांना दिली.

विक्रांत पाटील यांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांशी बोलून खड्डा बुजवण्यास सांगितले.

पण दिवाळीची सुट्टी असल्याकारणाने काम पूर्ण करून घेण्यात आले. विक्रांत पाटील माझा प्रभाग,माझी जवाबदारी या अनुषंगाने नागरिकांच्या समस्या नेहमी तत्परतेने सोडवतात याबद्दल नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

# कापुरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हरवलेल्या व्यक्तींचा शोध

**दै.रायगड नगरी । ठाणे**

कापुरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळया ठिकाणी राहणाऱ्या तीन व्यक्ती बेपत्ता झाल्या आहेत.त्याचे वर्णन असे आहे.

मुनिद्दीन अकबर शेख वय ४५ वर्षे, रा.एअर फोर्स,कोलशेत रोड, ठाणे. अंगाने मध्यम,रंग सावळा, चेहरा गोल, डोळे काळे, उंची ६ फुट १ इंच, नाक सरळ, अंगात काळया रंगाचा चेक्स शर्ट व त्यावर पांढऱ्या लायनिंग असलेला व जिन्स पॅन्ट, पायात काळया रंगाचे बुट सोबत मोबाईल, बोली भाषा मराठी, हिंदी अशी आहे. तर दुसऱ्या घटनेत कुमार विधान सुधाकर पप्पलवाड,वय १९ वर्षे, रा.निकम चाळ, शिवाजी नगर, बालकुम ठाणे .अंगाने सडपातळ,रंग गोरा,चेहरा गोल डोळे काळे, केस काळे व मध्यम वाढलेले उंची ५.५ फुट, नाक सरळ, अंगात पांढरा रंगाचा फुल शर्ट, निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, पायात स्पार्क कंपनीची निळ्या रंगाची चप्पल आहे. व तिसऱ्या घटनेत मातादीनी कोकसिंह राठोड, वय ४५ वर्षे रा.रुम नं.१२ सोना बिल्डींग, विनोद सोसायटी, बाळकुम पाडा नं.०१ दादलानी रोड, ठाणे. अंगाने मजबूत रंग,सावळा चेहरा, गोल डोळे, काळे केस, वाढलेली उंची ५ फुट ५ इंच, अंगात लाल निळया रंगाचा शर्ट व काळया पांढऱ्या रंगाची हाफ पॅन्ट, बोली भाषा हिंदी व मराठी अशी आहे. या वर्णनाच्या व्यक्ती कोणास आढळल्यास वरिष्ठ पोलीस निरिक्षक, कापुरबावडी पोलीस स्टेशन ठाणे, यांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


महाराष्ट्र शासन

महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145) 222167

**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ५९ सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साखर तळ्याचीवाडी ते गोवेले रस्ता प्रजिमा-१०० वर लहान पुलाचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (नाबार्ड) | ५५१६९०१ | ५६००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | पोलादपूर देवपूर गोळेगणी कुडपण रस्ता प्र.जि.मा.७१ कि.मी.४/५०० ते ७/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ रस्ते व पुल, ०४ जि.ई.मा.) | ८३७०९०३ | ८४००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ३ | पोलादपूर रानवडी सडे बोरवले रस्ता प्र.जि.मा.९८ कि.मी. ०/३०० ते ५/३०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ रस्ते व पुल, ०४ जि.ई.मा.) | ८३२८२७२ | ८४००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ४ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रा.मा.१३९ वरील कि.मी. १०/८०० ते १८/०० मध्ये आरसीसी बांधीव गटरचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ रस्ते व पुल, ०३ रा.मा.) | ७११०२४८ | ७२००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ५ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रा.मा.१३९ वरील कि.मी. १८/२०० ते २४/२०० मध्ये आरसीसी बांधीव गटरचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ रस्ते व पुल, ०३ रा.मा.) | ६६९५१२० | ६७००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ६ | पोलादपूर महाबळेश्वर वाई रस्ता रा.मा.१३९ वरील कि.मी.०/० ते १०/०० मध्ये आरसीसी बांधीव गटरचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (५०५४ रस्ते व पुल, ०३ रा.मा.) | ६६४५८१४ | ६७००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ७ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रा.मा.१३९ वरील कि.मी.२२/६०० ते २३/१०० मध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ रस्ते व पुल, ०३ रा.मा.) | ४४१०२११ | ४५००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ८ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रा.मा.१३९ वरील कि.मी. २१/३०० ते २१/४०० मध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ रस्ते व पुल, ०३ रा.मा.) | ४३०८९०८ | ४४००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ९ | पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्ता रा.मा.१३९ वरील कि.मी.१९/८०० ते १९/९०० मध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४ रस्ते व पुल, ०३ रा.मा.) | ४२८०८९३ | ४३००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच व वरील |

ई निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १०/११/२०२१ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २५/११/२०२१ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक २९/११/२०२१ वेळ ११.०० वाजता |

टिप : परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२३६६

दिनांक : ०१/११/२०२१

सही/-
(आर.के.बामणे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड



श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.दिपेश पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.१४०६/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.१६/१२/२०२१

१) श्री.जयराम छन्नर चौहान
रा.रुम नं.८, प्लॉट नं.बी-२, से.१५, कळंबोली, नवी मुंबई
२) श्री.रवि जयराम चौहान
रा.रुम नं.८, प्लॉट नं.बी-२, से.१५, कळंबोली, नवी मुंबई
३) श्री.गोविंद जयराम चौहान
रा.रुम नं.८, प्लॉट नं.बी-२, से.१५, कळंबोली, नवी मुंबई
४) कु.निशा जयराम चौहान
रा.रुम नं.८, प्लॉट नं.बी-२, से.१५, कळंबोली, नवी मुंबई
५) कु.रोशनी जयराम चौहान
नैसर्गिक पालनकर्ता म्हणून जयराम चौहान
रा.रुम नं.८, प्लॉट नं.बी-२, से.१५, कळंबोली, नवी मुंबई अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार नं.१ यांची पत्नी, अर्जदार नं.२ ते ५ यांची आई कै.इंद्रावती जयराम चौहान मयत रा.पडरी, बहबौली, उत्तरप्रदेश यांचे दि.२०/०५/२०१९ रोजी पडरी, बहबौली, उत्तरप्रदेश येथे निधन झाले. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**टाईप-एसएस-१ सी, प्लॉट नं.बी/२, कोर युनिट नं.८, से.१५, कळंबोली, नवी मुंबई, क्षेत्रफळ ३२ स्के.मी.**
**मिळकतीची किंमत ३२७२०**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयातचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावे.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारसदार म्हणून जाहीर करील व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०९ माहे ११ सन २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



राव साहेब

ॲड.दिपेश पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.१४०५/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२४/११/२०२१

१) श्रीम.अक्षता अमोल पाटील
रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
२) कु.दैविक अमोल पाटील
(नैसर्गिक पालनकर्ता त्याची आई म्हणजेच अर्जदार नं.१)
रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
३) श्री.मुरलीधर दत्तात्रेय पाटील
रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
४) श्रीम.शालिनी मुरलीधर पाटील
रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२ यांचे वडील व अर्जदार नं.३ व ४ यांचा मुलगा कै.अमोल मुरलीधर पाटील मयत रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांचे दि.२९/०५/२०२१ रोजी सुअस्थ हॉस्पिटल, रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**१) पुष्पक वहाळ, प्लॉट नं.११०, से.२४, क्षेत्रफळ १२० स्के.मी. आणि एफ.एस.आय. १.५**
**२) पुष्पक वहाळ, प्लॉट नं.४१०, से.२४, क्षेत्रफळ ३२० स्के.मी. आणि एफ.एस.आय. १.५ मध्ये मयताचा एक तृतीयांस हिस्सा**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयातचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावे.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारसदार म्हणून जाहीर करील व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०९ माहे ११ सन २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



Shri.Rao Saheb

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION. AT PANVEL

MISC. PETITION NO.1528 OF 2021

Exh : 9/D

Next Date : 15/12/2021

**1) DAVID GEORGE LAZARUS**
Residing at Flat No.C-110,Water Front, Kalyani Nagar Near Gold Gym, Pune City, Yerwada,Pune-Maharashtra-411006
**2)RUTH PHILLIP JACOB**
Residing at Flat No. D-2/103, Brahrnand Housing Complex, Kolshet Road, Near Saibaba Temple,Azad Nagar, Thane-400607
**3) PAULSON LAZARUS**
Residing at Kukreja Estate, A-101, Sector-11, CBD Belapur.Navi Mumbai-400614
**4)PRINCE LAZARUS**
of Kharghar Navi Mumbai , Occupation: Business, residing at Flat No.201,Morya Heights Plot 15,16, 17,Sector 18, Kharghar Navi Mumbai Maharashtra-410210 ...Petitioners

That DAVID GEORGE LAZARUS, RUTH PHILIP JACOB, PAULSON LAZARUS and PRINCE LAZARUS are the Legal Heirs or Lineal Descendant's of LAZARUS PAUL VARGHESE, the deceased abovenamed who died at MGM Hospital, Vashi, Navi Mumbai, on 28th day of November, 2013 and in the property description is in the name of the disease is attached.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**1. FLAT NO.201, SECOND FLOOR, ABOUT 996.45 SQ.FT CARPET AREA AND 55.00 SQ.FT. TERRACE IN THE BUILDING KNOWN AS "MORYA HEIGHTS", ON PLOT NO. 15, 16 & 17, SECTOR-18 KHARGHAR, NAVI MUMBAI.**

**2. LAND PARCEL AT SURVEY NO. 126/2(Old survey Number mentioned as per Sale Agreement dated 2/09/2009)157/2/B(New survey Number mentioned in Online 7/12 Extract available on Govt. Website)which are one only, AT VILLEGE - DHASAI, TALUKA- MURBAD, DIST - THANE**

You the member of public are hereby given notice to appear in the Court Of Civil Judge,Panvel in personal or by pleader duly instructed to file your Say/Objection in any within 30 (thirty)days from the date of publication of this public notice and which is the application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided. Given under the hands and Seal of this court of this 9 th 11/2021.

Sd/- Clerk Civil Court Senior Division Panvel — Court Seal — Sd/- Assistant Superintendent Civil Court Senior Division Panvel

# संक्षिप्त...

## बिबटयाला पकडण्यास वन विभागाला यश

**दै.रायगड नगरी । ठाणे**

गोरेगाव आरे दुग्ध वसाहतीमधे मागील दोन महिन्यांपासून धुमाकूळ घालणारी मादा बिबट TC ३२ हिला दिनांक ०३ नोव्हेंबर २०२१ रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास गोरेगाव आरे दुग्ध वसाहतीमधील युनिट नं. ४ मध्ये लावण्यात आलेल्या पिंजऱ्यामध्ये पकडण्यात यश आले आहे.

मादा बिबट ढउ ३२ हिला गोरेगाव आरे दुग्ध वसाहतीमधील वेगवेगळ्या युनीट मध्ये वनविभागामार्फत ट्रॅप कॅमेरे व पिंजरे लावण्यात आले होते. सदरची ढउ ३२ मादा बिबट हीला संजय गांधी नॅशनल पार्क बोरीवली येथिल रेस्क्यू सेंटर मध्ये ठेवण्यात आलेले आहे. असे ठाणे उप वनसंरक्षक, वन विभाग ठाणे यांनी कळविले आहे.

## सारडे विकास मंच तर्फे गडकिल्ले स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील सारडे विकास मंच तर्फे मुलांना गडकिल्याच महत्व आणि माहिती व्हावी यासाठी दरवर्षी किल्ले स्पर्धेचं आयोजन केल जात यावर्षी स्पर्धेत ५० स्पर्धकांनी सहभाग दर्शविला होता. लहान थोर सर्वच या स्पर्धेत सहभागी होताना दिसत आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्पर्धकास सारडे विकास मंचाचे कार्याध्यक्ष रोहित पाटील यांच्या कडून सन्मानचिन्ह देण्यात आले.

या वर्षी या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी रचित कांति म्हात्रे, द्वितीय,क्र. निल सुशांत म्हात्रे उत्तेजनार्थ सुयोग नारायण पाटील,,प्रियाल नितीन म्हात्रे तर सहभागी होणाऱ्या सर्वाना सहभाग म्हणून बक्षीस देऊन गौरवण्यात आले या किल्ले स्पर्धेसाठी सुयश क्लासेस आवरे चे अध्यक्ष निवास गावंड सर, साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजि कोप्रोलीचे राकेश पाटील , सह्याद्री प्रतिष्ठान उरणचे अध्यक्ष प्रितेश कोळी, अभिशेख कोळी, अक्षय कोळी, रोहित पाटील,त्रिनज पाटील, यांच्या उपस्थितीत किल्ले स्पर्धा वितरण सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमा प्रसंगी प्रितेश कोळी यांनी गडकिल्लयांच्या सदर्भात सर्व स्पर्धकांना सुंदर मार्गदर्शन केले तसेच सारडे विकास मंच चे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी सर्वाचे आभार मानले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# पोलादपूर तालुक्यात विकासकामे करून जनाधार मिळतो : आ.अनिकेत तटकरे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



तालुक्यातील तुर्भे पंचक्रोशीमध्ये येत्या काही महिन्यांत विकासकामांची पूर्तता झाल्यानंतर ग्रामस्थांना प्रत्यक्ष विकासकामांचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. पोलादपूर तालुक्यात विकासकामे करूनच जनाधार मिळतो. तालुक्यातील जनतेला राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल निर्माण होईल तसेच येत्या पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढीस पोलादपूर तालुक्यातून प्रतिसाद मिळेल, असा विश्वास कोकण विभागीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे आ.अनिकेत तटकरे यांनी व्यक्त केला.

पोलादपूर तालुक्यातील तुर्भे बुद्रुक रस्त्याचे उदघाटन, तुर्भे खुर्द रस्त्याचे उदघाटन, बांद्रेवाडी रस्त्याचे उदघाटन, वझरवाडीतील संरक्षण भिंत आणि तुर्भे कुंभारवाडी सभामंडपाचे भूमिपुजन असा विकासकामांचा झंझावात आ.अनिकेत तटकरे यांच्याहस्ते सुरू झाला. याप्रसंगी वझरवाडीतील विठ्ठल रूक्मीणी मंदिरामध्ये शेवटी सभेत रूपांतर झाले असता आ.अनिकेत तटकरे बोलत होते. याप्रसंगी सेवादल राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष वाय.सी.जाधव, तालुका सरचिटणीस सुहास मोरे, जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्षा प्रतिमा अभंग जाधव, शहर अध्यक्ष अजित खेडेकर, कृष्णा करंजे, मधुकर उतेकर, सुदास मोरे, बारकू शिंदे, नितीन आरडे, बाळकृष्ण चव्हाण,महमद मुजावर, भाई पाटेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

आ.अनिकेत तटकरे यांनी पुढे, कोरोना जागतिक महामारीच्या काळात आमदार निधी गोठविले जात असताना आपण निधी देऊ शकलो याचा आनंद असून तरूणांना रोजगार आणि नळपाणी योजना कशा कार्यान्वित यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून आपण प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. खासदार तटकरे आणि पालकमंत्री ना.अदितीताई तटकरे यांच्या माध्यमातून होणाऱ्या विकासकामांची येथील जनतेला अपेक्षा आहे, या अपेक्षांची पूर्तता करण्याच्या प्रयत्नात तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला व्यापक जनाधार मिळणार याची खात्री असल्याचे यावेळी आ.अनिकेत तटकरे सांगितले.

यावेळी वाय.सी.जाधव यांनी प्रास्ताविकामध्ये, दिवील ते सवाद रस्ता, तुर्भे न्यू इंग्लिश स्कूलच्या नवीन खोल्यांच्या उभारणीसाठी निधी, पोलादपूर तालुक्यातील तरूणांना रोजगार निर्मितीसाठी एमआयडीसीच्या उभारणीची मागणी करताना अन्य पक्षाचे नेते आपल्या कामांचे श्रेय घेत असल्याची टीकाही केली.

तुर्भे पंचक्रोशीमध्ये आ.अनिकेत तटकरे यांचे ठिकठिकाणी उत्साहामध्ये स्वागत करण्यात आले. यावेळी तुर्भे पंचक्रोशीतील विविध समस्यांसह महिला बचत गटांसंदर्भातील प्रोत्साहनासंदर्भात आ.तटकरे यांना निवेदने देण्यात आली. याप्रसंगी सहदेव उतेकर, मधुकर उतेकर, सुदास मोरे, गोविंद उतेकर, मंगेश उतेकर, कृष्णा उतेकर, नामदेव उतेकर तसेच अन्य ग्रामस्थ यावेळी तुर्भे पंचक्रोशीतील आ.अनिकेत तटकरे यांच्या दौऱ्यात सहभागी झाले होते.

# १ लाखाची लाच स्विकारणारा महापालिका सेस-एलबीटी विभागातील लिपीक अ‍ॅन्टी करप्शनच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिकेच्या संगणकिय प्रणालीत कंपनीच्या करावर लावण्यात आलेल्या दंडाची व व्याजाची रक्कम निरंक दाखविण्यासाठी कंपनी मालकाकडे ३ लाख रुपये लाचेची मागणी करणाऱ्या व त्यातील १ लाख रुपयांचा पहिला हफ्ता स्विकारणाऱ्या नवी मुंबई महापालिकेच्या सेस–एलबीटी स्थानिक संस्था कर विभागातील लिपिक (कंत्राटी कामगार) विनायक पाटील याला नवी मुंबई ऍन्टी करफ्शन ब्युरोच्या पथकाने १ लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

यातील तक्रारदारांची खैरणे एमआयडीसीमध्ये कंपनी असून नवी मुंबई महापालिकेकडून आलेला सन २०१३ ते २०१६ या कालावधीतील सेस कर त्यांनी २०१९ साली भरला होता. तक्रारदार यांनी २०१३ ते २०१६ या कालावधीतील सेस कर वेळेत न भरल्यामुळे त्यावर दंडाची रक्कम व व्याजाची रक्कम त्यांना भरावी लागणार असल्याची भिती सेस–एलबीटी विभागातील कर्मचारी विनायक पाटील यांनी दाखविली होती. तसेच कोपरखैरणे येथील सेस–एलबीटी विभागातील कार्यालयीन संगणकिय प्रणालीमध्ये त्यांच्या दंडाची रक्कम व व्याजाची रक्कम निरंक दाखविण्यासाठी लिपीक विनायक पाटील याने त्यांच्याकडे ३ लाख रुपये ला–चेची मागणी केली होती.

त्यामुळे कंपनी मालकाने नवी मुंबई ऍन्टी करफ्शन ब्युरोकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार अँन्टी करप्शन ब्युरोच्या पथकाने पडताळणी करुन सापळा लावला होता. त्यानंतर कंपनी मालकाने ३ लाख रुपये लाच देण्याचे कबुल करुन त्यातील १ लाख रुपयांचा पहिला हफ्ता देण्याची तयारी दर्शविल्यानंतर सेस–एलबीटी विभागातील लिपीक विनायक पाटील याने कंपनी मालकाला सीबीडी बेलापुर मधील दिवाळे गाव येथील बिकानेर स्वीट मार्ट समोर लाचेची रक्कम घेऊन बोलावले होते.

त्यानुसार सोमवारी दुपारी लाच घेऊन गेलेल्या कंपनी मालकाकडून लिपीक विनायक पाटील याने त्याच्या कारमध्ये १ लाख रुपयांची रक्कम स्विकारल्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरोच्या पथकाने त्याला रंगेहात पकडले. सदरची कारवाई नवी मुंबई ऍन्टी करफ्शन ब्युरोच्या पोलीस उपअधिक्षक ज्योती देशमुख व त्यांच्या पथकाने केली.

**मसाज पार्लरमधील फर्निचर पार्टेशनवर कोणत्याही प्रकारची अतिक्रमण कारवाई न करण्यासाठी मसाज पार्लर व्यावसायिकाकडे २४ हजार रुपये लाचेची मागणी करणाऱ्या नवी मुंबई महापालिकेच्या बेलापूर विभाग कार्यालयातील माहिती/नोंदणीकर लिपिक राकेश हिरालाल गेटमे (३८) व कनिष्ठ अभियंता (कंत्राटी कामगार) विजय प्रकाश लावंड (३१) या दोन कर्मचाऱ्यांविरोधात नवी मुंबई अँटी करप्शन युनिटने गत आठवड्यात कारवाई करुन गुन्हा दाखल केला आहे. त्यापाठोपाठ महापालिकेच्या एलबीटी सेस विभागातील लिपीक विनायक पाटील हा कंत्राटी कामगार अँटी करपशन ब्यूरोच्या जाळ्यात सापडल्याने महापालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे.**

# खांब ते पंढरपूर पायी वारी दिंडींचे पालकमंत्र्यांकडून स्वागत



**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील श्री.संत सेवा मंडळ खांब पंचक्रोशी व वारकरी सांप्रदाय प्रसारक मंडळ खांब यांच्या वतीने ता.७ रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या दिंडीचे रायगड जिल्हा पालकमंत्री तथा राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या सुतारवाडी येथील गीताबाग नर्सरी येथे मोठ्या उत्साहात व भक्तीमय वाता–वरणात स्वागत केले.

स्वा. सु. गुरूवर्य अलिबागकर बाबा, धोंडू महाराज कोलाटकर व गोपाळ महाराज वाजे यांचे कृपात्राखाली दिंडीचे अध्यक्ष ह.भ.प.कृष्णा महाराज जाधव व ह.भ.प.मारूती महाराज कोलाटकर तसेच ह.भ.प.क्रुष्णा महाराज थिटे यांच्या कुशल नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या या दिंडी सोहळ्यात ह.भ.प.नामदेव महाराज यादव, ज्ञानेश्वर लोखंडे, मोरेश्वर मरवडे, कृष्णाराम धनवी, अजय पार्ठे, गणेश जाधव, किशोर लोखंडे, शांताराम महाडिक, नारायण लोखंडे, सहादेव बाईत, गोपाळ शिंदे, देविदास भोईर, राम सावंत, राधिका लोखंडे आदी प्रमुख सांप्रदायिक मंडळींसह मोठ्या संख्येने भाविक भक्त व भगिनी सहभागी झाल्या आहेत.

तर पायी वारी दिंडीसाठी शासकीय नियमानुसार सर्व बाबींचे यथायोग्य पद्धतीने पालन करून सदर दिंडी खांब वरून पंढरपूरकडे मार्गस्थ झाली असल्याची माहितीही दिंडी संचालकांकडून देण्यात आली आहे.

# ज्येष्ठ नागरिकाच्या डोक्यात दारुची बाटली फोडणारे दोघे तरुण अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नेरुळ येथील गावदेवी मंदिराच्या आवारात दारु पिण्यासाठी बसलेल्या तरुणांना हटकणाऱ्या ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाच्या डोक्यावर दोघा तरुणांनी दारुची बाटली फोडून पलायन केल्याची घटना उघडकिस आली आहे. या हल्ल्यात सदर ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी झाले असून त्यांना महापालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात उपच–ारार्थ दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर नेरुळ पोलिसांनी दोघा हल्लेखोर तरुणांविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली आहे.

या घटनेत जखमी झालेले नारायण गणु पाटील (७२) हे ज्येष्ठ नागरिक नेरुळ गावात कुटुंबासह राहण्यास असून ते नेरुळ मधील गावदेवी मंदिराचे विश्वस्त आहेत. पाटील हे दररोज सायंकाळी देवीची आरती करण्यासाठी जात असतात. ते गावदेवी मंदिरात आरतीसाठी गेले होते. मात्र ते जाण्यापुर्वीच आरती झाल्याने काहीकाळ मंदिरात थांबुन ते रात्री ८.३० च्या सुमारास आपल्या घरी जाण्यासाठी निघाले. यावेळी मंदिराच्या आवारात बाथरूम जवळ नारायण पाटील यांच्या ओळखीतील तरुण रतिन मदन आचार्य (२३) व त्याचा साथीदार पियुष पाटील (२१) हे दोघे तरुण दारु पित बसल्याचे नारायण पाटील यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे पाटील यांनी दोघांना हटकुन त्यांना मंदिर आवारात दारु न पिण्याबाबत समज दिली. या गोष्टीचा त्यांना राग आल्याने पियुष पाटील याने त्यांना शिवीगाळ केली, तर रतिन आचार्य याने नारायण पाटील यांचे दोन्ही हात पकडून ठेवले. त्यानंतर पियुष पाटील याने नारायण पाटील यांच्या डोक्यात दारुची काचेची बाटली फोडली. त्यामुळे नारायण पाटील यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन ते खाली पडले. त्यानंतर दोघा हल्लेखोर तरुणांनी त्या ठिकाणावरुन पलायन केले.

## माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

# एस.टी.कामगारांच्या मागण्या मान्य करा सरकारला आव्हान : रमेश मोरे

**दै.रायगड नगरी । माणगाव**



नुकताच रायगड जिल्ह्यात दि ४ व ५ नोव्हेंबर रोजी अचानक अवकाळी पाऊस पडल्यामुळे माणगांव तालुक्यातील बळी राजाचे खूप मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे.तोंडात पडायला आलेला घास या अवकाळी पावसाने हिरावून त्यांची नासाडी केली आहे. शेतकऱ्यांच्या हाताला पेंडा सुध्दा उरला नाही अशी प्रतिक्रिया माणगांव तालुका शे.का.प पक्षाचे सरचिटणीस रमेश मोरे यांनी माणगांव तहसिलदार प्रियंका आयरे यांना मंगळवार दि.९ नोव्हेंबर रोजी निवेदन देताना व्यक्त केले. यावेळी माजी जि.प सभापती अस्लम राऊत, कृषी बाजार समिती सभापती संजय पंदेरे, सुरव ग्रामपंचायत माजी सदस्य मधुकर अर्बन, डोगरोली ग्रामपंचायत माजी सरपंच संजय गायकवाड, मोर्बा ग्रामपंचायत माजी सरपंच विलास गोठल, नथुराम मोरे, विलास मोरे, वणी ग्रामपंचायत सरपंच मौझम बारामपुरे, तसेच शे.का.प.चे अनेक कार्यकर्ते यावेळी निवेदन देताना उपस्थित होते.

तसेच माणगांव तालुक्यातील शेतकऱ्यांना मागील दोन वर्षा पासून कोरोना तसेच निसर्ग चक्रिवादळ, अतिवृष्टी या झालेल्या निसर्ग संकटापासून सर्व सामान्य शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.या झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी असे आव्हान प्रस्थापित सरकारला रमेश मोरे यानी शेवटी प्रतिनिधी जवळ बोलताना सांगीतले. तसेच यावेळी राज्यभरामध्ये एस टी महामंडळ कामगाराने आपल्या विविध मागण्यांसांठी संप पुकारलेला असून त्या संपाला माणगांव तालुका शे.का.प चे सरचिटणीस रमेश मोरे यांनी पक्षाकडू पूर्ण पणे पाठींबा दर्शवला आहे.तसेच त्यांनी माणगांव बस स्थानकात बसलेल्या एस टी कामगारच्या संपामध्ये देखील सामील होऊन बोलताना सांगितले की गेल्या दोन वर्षे कोरोना असता देखील एस टी कामगारांने आपली जीवाची व परिवारांची परवा न करता दिवस रात्र ते काम करत होते आणि अशा कर्मचाऱ्यांना आता सरकार त्यांच्या मागण्या साठी झुलवत आहे.

# १८ नोव्हेंबर रोजी कपिलधार येथे शिवा संघटनेचा राज्यव्यापी मेळावा

**दै.रायगड नगरी । उरण**

वीरशैव लिंगायत समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणारी, वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध समस्यांना वाचा फोडण्याचे काम करणाऱ्या, गळ्यात इष्टलिंग, कपाळावर भस्म धारण करून भगवान शिव शंकराला आपले दैवत मानणाऱ्या वीरशैव लिंगायत समाजाचे नेतृत्व करणारी एकमेव व आक्रमक लोकशाही पद्धतीने चालणारी संघटना म्हणजे शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना म्हणून सर्वपरिचित आहे.शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या निमित्त होणाऱ्या यात्रेमध्ये श्री क्षेत्र कपिलधार ता. जि–बीड महाराष्ट्र राज्य येथे भव्य राज्यव्यापी वार्षिक मेळावा आयोजित केला जातो. त्यासाठी राज्यभरातुन सुमारे ४ ते ५ लाख कार्यकर्ते व भाविक भक्त उपस्थित राहतात. शिवा संघटनेच्या मागणीनुसार श्री क्षेत्र कपिलधार येथे पंढरपुर प्रमाणेच सन २००२ पासून महाराष्ट्र शासनाच्या वतीने शासकीय महापूजा करण्यात येत आहे. दि १९ नोव्हेंबर २००२ रोजी पहिली शासकीय महापूजा संपन्न झाल्यानंतर कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या यात्रे निमित्त प्रतिवर्षी शासकीय महापूजा संपन्न होत आहे. शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे व विविध मान्यवर यांच्या उपस्थितीत सदर शासकीय महापूजा संपन्न होत असते.या वर्षी शासकीय महापुजेचे हे २० वे वर्ष असून १८ नोव्हेंबर २०२१ रोजी श्री क्षेत्र कपिलधार येथे शासकीय महापूजा व शिवा संघटनेच्या वतीने २६ व्या राज्यव्यापी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक राज्यातील लाखो वीरशैव लिंगायत भाविकांचे श्रद्धा स्थान असलेले श्री क्षेत्र कपिलधार ता. जि–बीड येथे १६ व्या शतकातील वीरशैव संत श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांची संजीवन समाधी आहे. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र कपिलधार येथे १८ नोव्हेंबर २०२१ रोजी गुरुवारी दुपारी ठीक ४ वाजता २० वी शासकीय महापूजा शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे, महाराष्ट्राचे मंत्री ना. धनंजय मुंडे, माजी मंत्री ना. अशोकराव चव्हाण, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते संपन्न होणार असून त्यानंतर या मान्यवरांच्या उपस्थितीत शिवा संघटनेचा २६ वा. राज्यव्यापी वार्षिक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

यावेळी सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, विविध सामाजिक कार्यकर्ते, शिवा संघटनेचे राज्य पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, तालुका स्तरावरील पदाधिकारी यांच्यासह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या वीरशैव मठाचे अनेक मठाधिपती(शिवाचार्य),वीरशैव लिंगायत समाजाचे धर्मगुरु उपस्थित राहणार आहेत. शिवा संघटनेच्या २६ व्या राज्यव्यापी मेळाव्याचे उदघाटन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या हस्ते होणार आहे.

# शेतकरी व मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई द्या : शेकापची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

नुकत्याच समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने रायगड जिल्ह्यासह मुरुड तालुक्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी बांधवांचे शेतात उभे असलेल्या भातपिकाचे तसेच मच्छिमार बांधवांचे सुकविण्यासाठी ठेवलेल्या मच्छिचे लाखो चे नुकसान झाले.अवकाळी पडलेल्या पावसामुळे नुकसान ग्रस्ताना तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तालुका चिटणीस मनोज भगत यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मुरुड तहसीलदार यांना एक निवेदन सादर करण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे.यावेळी सदर निवेदन महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे यांनी स्विकारले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, रायगड जिल्ह्यात दि.४व दि.५ नोव्हेंबर २०२१ रोजी अवकाळी मुसळधार पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी शेतात कापून ठेवलेले भात, भाताचे भारे (उडवी) तसेच शेतातील उभ्या असलेल्या भातपिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

मुरुड तालुक्यातील शेतकऱ्यांचे मागील दोन वर्षांपासून कोरोना महामारी मुळे, पावसामुळे, निसर्ग,तौक्ते अशा चक्रिवादळामुळे अतोनात नुकसान झाले आहे.त्यातच दि.५ नोव्हेंबर रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे कापणी केलेले भात तसेच शेतातील उभे पीक आडवे होऊन मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सन.२०१९ पासून ते आजतागायत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीच्या झालेल्या नुकसानीला सामोरे जावे लागले असतानाच आता पुन्हा आलेल्या या संकटाने शेतकरी खचून गेला आहे.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येऊन नुकसान ग्रस्ताना तातडीने मदत देण्यात यावी.याबाबत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निवेदनाद्वारे आपणास मागणी करीत असल्याचे व आमच्या भावना सरकार दरबारी कळविण्यात याव्यात.असे निवेदनात म्हटले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस मनोज भगत, मनोहर बैले, जिल्हा परिषद सदस्या नम्रता कासार, तालुका पंचायत समितीचे माजी सभापती रमेश नागावकर, चंद्रकांत कमाने, निता गिदी, विजय गिदी, संतोष पाटील, अजित कासार, सी.एम.ठाकूर, खार अंबोली सरपंच संतोष मोकल, बोर्ली ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन, उपसरपंच मतीन सौदागर, रमेश दिवेकर, विद्याधर चोरघे, महादेव गायकर, नंदकुमार धारवे, रघुनाथ ठाकूर, मुबस्सिर लालसे, विकास दिवेकर, महेंद्र आंबटकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.शेवटी विजय गिदी यांनी आभार मानले.